# भुयारी मेट्रोचा पावसाळी कंट्रोल रुम सज्ज

▪मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ भुयारी मेट्रो रेल्वे प्रकल्पाची उभारणी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाचा (एमएमआरसी) पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज झाला आहे. साचणारे पाणी उपसण्यासाठी ४२८ पंप आणि १५ तत्काळ सेवा वाहनांची व्यवस्था या कक्षासाठी करण्यात आली आहे. आपत्तीच्या काळात नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी ९१९१३६८०५०६५ आणि ९१३५०६७०६४७७ हे हेल्पलाइन क्रमांक देण्यात आले आहेत.